स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

सत्यमेव जयते

एकच लक्ष्य शहरे स्वच्छ
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.०

नगर विकास विभाग
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)

मार्गदर्शक पुस्तिका



KAUTILYA
MULTICREATION PVT LIMITED

KNOWLEDGE PARTNER
KUSHAAGRA
Innovations
Foundation

मार्गदर्शक पुस्तिका

प्रास्ताविक १



महात्मा गांधींचे स्वच्छ भारत'चे स्वप्न साकार करण्यासाठी राष्ट्राच्या विकासाच्या उद्दिष्टांच्या केंद्रस्थानी स्वच्छ भारत मिशनने स्वच्छता ही संकल्पना प्राधान्याने ठेवली आहे.

स्वच्छ भारत मिशन (नागरी) मोहिमे अंतर्गत समाविष्ट महत्त्वाच्या काही मार्गदर्शक सूचनांपैकी क्षमता बांधणी हा एक घटक आहे. या मोहिमेच्या घटकांची प्रभावीपणे अंमलबजावणीसाठी तांत्रिक कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, मुकादम व स्वच्छता कर्मचारी यांना क्षमता बांधणी या घटका अंतर्गत प्रशिक्षण देणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांची कार्यक्षमता आणि कौशल्ये विकसीत होऊन या मोहिमेची उद्दिष्टे शाश्वत रीतीने साध्य होतील. स्वच्छ महाराष्ट्र मिशनने (नागरी) अंतर्गत कचऱ्याचे पूर्णवापरचक्र, नागरिकांच्या वर्तणुकीतील बदल, कचराप्रक्रिया तंत्रज्ञान आणि उत्तम कार्यक्षमतेचे धोरण या विषयांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन केले आहे. ज्ञानाच्या प्रसारास चालना देण्यासाठी, घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पांच्या बाबतीत योग्य निर्णय घेण्यासाठी आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी विशिष्ट मार्गदर्शन मिळावे, यासाठी एका संदर्भ पुस्तकाची गरज होती. महाराष्ट्र शासनाच्या वतीने **"एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन"** ही मार्गदर्शक पुस्तिका सर्वांसमोर ठेवतांना मला आनंद होत आहे. ही पुस्तिका शाश्वत कचरा व्यवस्थापन पद्धतीची अंमलबजावणी करण्यासाठी सर्व नागरी स्थानिक संस्थांना मार्गदर्शक ठरेल.

महाराष्ट्रातील सर्व नगरपरिषदा आणि नगर पंचायतींसाठी मार्गदर्शक साधन म्हणून या संदर्भपुस्तिकेची संकल्पना मांडल्याबद्दल मी स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) संचालनालयाचे अभिनंदन करतो.

सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधीत स्वच्छता निरीक्षक, मुकादम व स्वच्छता कर्मचारी यांना भविष्यातील सर्व उपक्रमांदरम्यान सदर पुस्तीकेचा संदर्भ घेण्याची शिफारस करत आहे. मला खात्री आहे की संकलित करण्यात आलेली मार्गदर्शक तत्त्वे आपली ध्येये साध्य करण्यास सहाय्यभूत ठरतील. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या शहरांमध्ये शाश्वत कचरा व्यवस्थापन पद्धती लागू करण्यास प्रोत्साहित करतील. या संदर्भपुस्तिकेतील तत्त्वांची अंमलबजावणी केल्याने कचऱ्याविषयी जागरूक असलेली पिढी तयार होईल.

डॉ. के. एच. गोविंद राज, भाप्रसे

प्रधान सचिव

नगरविकास विभाग- २

प्रास्ताविक २



स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना घनकचरा व्यवस्थापनासाठी आधुनिक आणि वैज्ञानिक पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहित करते. घनकचरा व्यवस्थापनातील वाढत्या आव्हानांचा सामना करणे, संसाधन प्राप्ती, पूर्णवापरचक्र आणि कचऱ्यापासून महसूल निर्मिती करणे आवश्यक आहे. शाश्वत विकास उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना सक्षम करणे हे अभियानाचे उद्दिष्ट आहे. स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) 2.0 च्या अनुषंगाने महत्त्वपूर्ण मार्गदर्शक तत्वे आणि नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रभावी घनकचरा व्यवस्थापन करण्यासाठी **"एकात्मिक घनकचरा व्यवस्थापन"** ही माहिती पुस्तिका तयार करण्यात आली आहे.

कार्यक्षम कचरा व्यवस्थापन प्रणाली विकसित करण्यासाठी आवश्यक ज्ञान आणि साधनांसह स्थानिक स्वराज्य संस्थांना सुसज्ज करणे आणि भावी पिढ्यांसाठी स्वच्छ, आरोग्यदायी वातावरण निर्माण करणे हे या मार्गदर्शक पुस्तिकेचे उद्दिष्ट आहे. ही पुस्तिका महाराष्ट्रातील प्रभावी घनकचरा व्यवस्थापन पद्धती साध्य करण्यासाठी काम करणारे तांत्रिक कर्मचारी, स्वच्छता निरीक्षक, मुकादम आणि स्वच्छता कर्मचारी यांना सहाय्यभूत ठरेल.

नगरविकास विभागाच्या मार्गदर्शनाखाली ही पुस्तिका तयार करण्यात आली आहे. त्यांचे मी आभार मानू ईच्छितो. कौटिल्य आणि नॉलेज पार्टनर कुशाग्र इनॉव्हेशन फाऊंडेशनने महाराष्ट्रातील लहान नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी या संदर्भपुस्तिकेच्या निर्मिती आणि संकलनासाठी केलेले प्रयत्न अतिशय प्रशंसनीय आहेत.

मी महाराष्ट्रातील नगरपरिषदा आणि नगर पंचायतींना ही पुस्तिका वापरण्याचे आवाहन करतो.

नवनाथ वाठ
राज्य अभियान संचालक
स्वच्छ महाराष्ट्र अभियान (ना.)

आराखडा

भाग १ : दैनंदिन जबाबदाऱ्या व कामे ७
१. स्वच्छता निरीक्षकांची कार्ये व जबाबदाऱ्या ७
अ. सर्वसाधारण कामे ७
ब.घनकचरा व्यवस्थापन ७
क. झाडणकाम ७
ड. प्लास्टिक बंदी ८
इ. दंडात्मक कारवाई ८
ई. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता ८
उ. नाले साफसफाई ८
ऊ. पावसाळी कामे ८
ए. नागरिकांशी संवाद ८
२. मुकादमांची कामे ९
अ. सर्वसाधारण कामे ९
३. शिष्टाचार ९
४. पत्रव्यवहार ९
५. जागेच्या वापराबाबत कारवाई व स्वच्छता विभागाची भूमिका १०
अ. कोंडवाडा १०
ब. डुकरे बंदोबस्त १०
भाग २ : कामाचे नियोजन व आवश्यक साधने/उपकरणे ११
१. घनकचरा संकलन व वाहतूक (वाहन कर्मचारी) ११
वाहनावरील कर्मचाऱ्यांची जबाबदारी ११
कचरा गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणे ११
२. प्रक्रिया केंद्रावरील कर्मचाऱ्यांसाठी ११
अ. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया ११
ब. सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया १२
कचरा प्रक्रिया केंद्रावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणे १२
३. झाडणकाम कर्मचाऱ्यांसाठी १२
झाडणकामाच्या हद्दी किती असाव्यात? १२
झाडणकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणे १४
४. गटार/नाले सफाई कर्मचाऱ्यांसाठी १५
अ. नाले सफाई १५
ब. मलकुंडाची सफाई १६
क. बंदिस्त जागेत सफाईसाठी प्रवेश करणे १७
ड. विष्ठाजन्य गाळाची विल्हेवाट १८

आराखडा

भाग ३ : दंडात्मक कारवाईची तरतूद १९
१. या कृती केल्यावर पुढील अधिनियमांतर्गत कार्यवाही करण्यात यावी १९
२. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी २०
भाग ४ : महत्त्वाचे शासन निर्णय व अंमलबजावणी २१
भाग ५ : विविध योजना व त्यांची पूरक माहिती ३०
अ. योजनांचे लाभ व पात्रता ३०
ब. आवश्यक दस्तावेज ३३
क. आवश्यक लसीकरण व त्याची वारंवारिता ३४
परिशिष्ट अ ३४
पत्राचे नमुने ३७

टेबल/तक्ता

टेबल/तक्ता १ : झाडणकामाच्या हद्दी १२
टेबल/तक्ता २ : झाडणकामाची वारंवारिता १३
टेबल/तक्ता ३ : झाडण कामाची अवजारे व उपकरणे १४
टेबल/तक्ता ४ : नाले सफाई करण्याचे प्रमुख ३ टप्पे १५
टेबल/तक्ता ५ : नाले साफ करताना लागणारी अवजारे व उपकरणे १५
टेबल/तक्ता ६ : मलकुंडाची यांत्रिक सफाई १६
टेबल/तक्ता ७ : मलकुंडाच्या यांत्रिक सफाईसाठीची सुरक्षा उपकरणे १७
टेबल/तक्ता ८ : बंदिस्त जागेत सफाईसाठीची अवजारे व सुरक्षा उपकरणे १८
टेबल/तक्ता ९ : अधिनियमांतर्गत कृतीसह कार्यवाही १९
टेबल/तक्ता १० : नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी व अधिनियम १०
टेबल/तक्ता ११ : अधिकृत खतपरीक्षण प्रयोगशाळा २४
टेबल/तक्ता १२ : कचरा संकलनासाठीचे शुल्क २८
टेबल/तक्ता १३ : प्रसंग व दंड आकारणी २९
टेबल/तक्ता १४ : समाजकल्याण योजना ३३
टेबल/तक्ता १५ : समाजकल्याण योजनेसाठी लागणारे आवश्यक दस्तावेज ३३
टेबल/तक्ता १६ : लसीकरण व वारंवारिता ३४
टेबल/तक्ता १७ : महाराष्ट्र नगरपरिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ ३६

भाग १ : दैनंदिन जबाबदाऱ्या व कामे

१. स्वच्छता निरीक्षकांची कार्ये व जबाबदारी :

अ. सर्वसाधारण कामे:

१. प्रभागात दैनंदिन पाहणी करावी, शक्यतो पायी फिरावे, प्रत्येक झाडणहद्द तपासता येईल याप्रमाणे राउंड घ्यावा, मुकादमांसोबत कामाच्या नियोजनाबाबत संवाद साधणे, पाहणीदरम्यान इतर खात्यांकडील तक्रारी त्याच दिवशी संबंधित खात्याला लेखी स्वरूपात कळवाव्यात.
२. आपली दैनंदिनी विस्तृत स्वरूपात लिहावी. स्वत: ची वर्कशीट ठेवावी व आलेले पत्र वर्कशीटमध्ये नोंदवून ठेवावे.
३. आपणास नगरपरिषद/ नगरपंचायतीमधील विविध विभाग व त्यांची कामे याबाबत माहिती असणे आवश्यक आहे.
४. दैनंदिन हजेरी मस्टर तपासून जास्त काळ गैरहजर सेवकांवर केलेल्या कारवाईची सविस्तर माहिती ठेवावी.
५. आपल्याकडील क्षेत्राचा दैनंदिन, साप्ताहिक, मासिक व वार्षिक अहवाल तयार करावा. उदा. कचरा उठाव, नोटीस रजिस्टर, खटला रजिस्टर, विविध प्रकारची कारवाई इ.
६. स्वच्छ सर्वेक्षण , शून्य कचरा शहर , हगणदारी मुक्त शहर,माझी वसुंधरा या उपक्रमांची आपल्या कामाशी पूरक अशी आखणी करून अंमलबजावणी करणे.
७. विविध सणांमध्ये किंवा सणांदरम्यान शहरातील स्वच्छतेबाबत नियोजन करणे.
८. स्वच्छताकार्यासाठी आवश्यक असलेली साधनसामग्री आणि मनुष्यबळ पुरवणे.

ब.घनकचरा व्यवस्थापन:

१. शहरातील कच-याचे १००% संकलन, १००% वाहतूक व १००% प्रक्रिया होईल असे पहावे.
२. घरे आणि व्यवसायांमधून कचरा वेळेवर आणि योग्यरीत्या काढला जात आहे याची खात्री करणे.
३. कचरा संकलन करणाऱ्या वाहनांचा मासिक अहवाल तयार करावा.
४. कचराप्रक्रिया प्रकल्पातील कार्यावर देखरेख ठेवणे.
५. दैनंदिन निर्माण होणाऱ्या कचऱ्याची नोंद तपासणे.

क. झाडणकाम:

१. ग्रुप स्वीपिंगच्या तक्त्याप्रमाणे कामाची पाहणी करावी व त्याचा अहवाल दर आठवड्याला कार्यालयात सादर करावा.
२. ग्रुप स्वीपिंग लावताना झाडणहद्दीच्या संख्येला सहाने भागावे, तेवढया हद्दी रोज पाहाव्यात.

ड. प्लास्टिक बंदी:

१. प्लास्टिक व इतर दंडात्मक कारवाईचा सविस्तर अहवाल पावतीवरील कारणासह रजिस्टरमध्ये नोंदवावा.

२. शहरात प्लास्टिकबंदी उपक्रम सक्रियपणे राबवणे.

इ. दंडात्मक कारवाई:

१. शहरामध्ये अस्वच्छता करणे, बंदी असलेल्या प्लास्टिकचा वापर करणे, अनधिकृत बॅनर लावणे इ. कृतींवर दंडात्मक कारवाई करणे.

२. बांधकामाचा राडारोडा रस्त्यावर, खुल्या जागांवर टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाई करणे.

ई. सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता:

१. शहरातील सार्वजनिक उद्याने आणि बागेची देखभाल करणे.

२. रस्त्यावरील प्राण्यांच्या नियंत्रणावर देखरेख करणे.

३. शहरातील स्वच्छता आणि आरोग्यविषयक योजनांची अंमलबजावणी करणे.

उ. नाले साफसफाई:

१. शहरातील रस्ते, गटारे, नाले, सार्वजनिक शौचालये आणि इतर सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्याची(असल्याची) खात्री करणे.

२. शहरात संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखण्यासाठी उपाययोजना करणे.

३. नाले आणि गटारी स्वच्छ आणि प्रवाहित आहेत याची खात्री करणे व त्यांच्या स्वच्छतेचे वेळापत्रक तयार करून ते अंमलात आणणे.

ऊ. पावसाळी कामे:

१. पावसाळ्यामध्ये साथीचे आजार पसरू नयेत याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे. उदा. जंतुनाशक फवारणी करणे.

२. शहरात कुठे पाणी साठून राहू नये याकरिता शहराची पाहणी करणे , शाळा ,कार्यालय ,व्यावसायिक दुकाने यांना नोटिस / माहितीपत्रक देणे , या संदर्भातील माहितीपत्रक प्रसिद्ध करणे

ए. नागरिकांशी संवाद:

१. नागरिकांमध्ये स्वच्छतेची सवय लावण्यासाठी जनजागृती कार्यक्रम आयोजित करणे.

२. घनकचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेचे महत्त्व याबद्दल नागरिकांना शिक्षित करणे.

३. स्वच्छता मोहिमा आणि कार्यक्रमांमध्ये नागरिकांचा सहभाग वाढवणे.

४. शहरातील बचत गट, NGO, सजग नागरिक, विविध संस्था यांना सोबत घेऊन विविध विषयांवर जनजागृती करणे.

२. मुकादमांची कामे

अ. सर्वसाधारण कामे:

१. १ मार्च ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत सकाळी 6:00 वाजता आणि १ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी या कालावधीत सकाळी ६:३० वाजता मदतनीस आणि इतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती घेणे.
२. स्वच्छता कर्मचाऱ्यांना कामाचे वाटप करणे.
३. स्वच्छता कार्याचा अहवाल स्वच्छता निरीक्षकांकडे सादर करणे यासाठी दैनंदिनीमध्ये रोजचा अहवाल लिहिणे.
४. आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांवर देखरेख ठेवणे आणि त्यांना मार्गदर्शन करणे
५. नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाच्या प्रमुखांच्या आदेशानुसार इतर कामे करणे.
६. कार्यक्षेत्राच्या हद्दीतील सर्व कचरा विलगीकृत स्वरूपामध्ये गोळा करण्यासाठी नियोजन करणे.
७. प्लास्टिक पिशव्या / कॅरीबॅग विरुद्ध कारवाई करण्यासाठी वरिष्ठांना मदत करणे .
८. संसर्गजन्य रोगांचा प्रसार रोखण्यासाठी निर्जंतुकीकरण आणि fumigation करणे.
९. नागरिकांकडून तक्रारी आणि सूचना स्वीकारणे आणि त्यांचे निराकरण करणे.
१०. सार्वजनिक शौचालये आणि मूत्रालये स्वच्छ आणि निर्जंतुक ठेवणे.
११. नाले आणि गटारे स्वच्छ ठेवणे आणि त्यांची नियमितपणे देखभाल करणे.
१२. रस्ते, फुटपाथ आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवणे.
१३. पाण्याच्या टाक्या आणि हौद स्वच्छ आणि निर्जंतुक ठेवणे.
१४. मृत प्राण्यांच्या योग्य विल्हेवाटीची व्यवस्था करणे.

३. शिष्टाचार:

१. रोज योग्य गणवेशामध्ये व कामाच्या दिलेल्या वेळेत त्या त्या ठिकाणी उपस्थित असावे.
२. नागरिकांशी बोलताना नम्रतेने बोलावे.

४. पत्रव्यवहार

- प्रत्येक पत्राचे शक्यतो उत्तर पाठवावे, शक्य नसल्यास त्या पत्राच्या मागे स्वत:ची नोट लिहावी.
- कोठेही सही करताना सहीच्या खाली नेहमी तारीख लिहावी.
- प्रत्येक पत्राचे अगोदर निवेदन लिहून मान्यता घ्यावी. निवेदन लिहिताना पत्र का लिहिता, प्रत्यक्ष तपासणीची तारीख, वेळ, त्यामध्ये आढळलेले निष्कर्ष, त्यावर आपले मत व त्यानुसार आज्ञा मागाव्यात, नंतर संबंधितांना पत्र लिहावे.
- माहिती अधिकार, Z +, लोकशाही दिन, तारांकित प्रश्न अशा पत्रांची उत्तरे त्वरित पाठवावीत.
- आपले सरकार, पी.जी पोर्टल, स्वच्छता अँप इ. पोर्टल वा आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित तक्रारींचे निराकरण वेळेत पूर्ण करून त्या त्या ठिकाणी माहिती अद्ययावत करावी.

५. जागेच्या वापराबाबत कारवाई व स्वच्छता विभागाची भूमिका:

अ. कोंडवाडा

- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या मुख्य अधिकारी यांचेकडून कोंडवाड्यासाठी (मा. जिल्हाधिकारी यांचे मान्यतेने) जागेची निश्चिती झाल्यानंतर प्रत्यक्षात कोंडवाडा अस्तित्वात आल्यानंतर त्यांचे व्यवस्थापन करण्याची जबाबदारी स्वच्छता निरीक्षकांची असते.
- जसे की, तेथील स्वच्छता राखणे, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात मोकाट फिरणाऱ्या जनावरांवर कारवाई करून त्यांना पकडून कोंडवाड्यात दाखल करणे, दाखल जनावरांची संख्या, वर्णन, दाखल करणाऱ्याचे नाव, दाखल करण्याची वेळ, इ. माहीती रखवालदारामार्फत ठेवणे, त्यांना वेळचेवेळी चारा देणे, पाणी पाजणे, जनावरांचे मालक जनावरे सोडवण्यासाठी आले तर त्यांच्या कडून स्थानिक स्वराज्य संस्थेने ठरवलेला दंड वसूल करून जनावरे पुन्हा मोकाट सोडणार नाही, या बाबत लेखी घेऊन जनावरे ताब्यात देणे, त्या रकमेचा भरणा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कोषागारात करणे, इ. कामे स्वच्छता निरीक्षकाला त्यांच्या कार्यकक्षेतील सेवकांमार्फत करावी लागतात. ही जनावरे निर्धारित दिवसांत मालकाने सोडवली नाहीत तर त्या जनावरांचा लिलाव करणे.
- जी व्यक्ती त्यांच्या मालकाची जनावरे सार्वजनिक अथवा खाजगी जागेत सोडील /अतिक्रमण करील त्यास दंड/शिक्षा होऊ शकते. किंवा ज्या खाजगी मालकीच्या जागेत नुकसान केले असेल तर जनावरांच्या मालकास दंड होइल.
- दुग्ध व्यवसायासाठी पाळलेल्या जनावरांना कोणताही तबेल्यातील कचरा/घाण/विष्ठा किंवा इतर दुर्गंधीयुक्त पदार्थ खाऊ घालता कामा नये/किंवा खाऊ देणार नाही. असे करताना आढळलयास दंड करता येईल.

ब. डुकरे बंदोबस्त

- स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात अथवा इतरत्र कुठेही डुक्कर पालनामुळे लोकांना त्रास होत असेल किंवा तशी संभाव्यता असेल आणि अश्या परिस्थित देखिल डुक्कर पालन करावयाचे असल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेची परवानगी घ्यावी.
- अशी विनापरवाना डुकरे स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कार्यक्षेत्रात अथवा कोठेही डुकरे पाळल्याने तसेच दैनंदिन जीवनात लोकांना त्रास होइल अश्या पद्धतीने पाळल्यास, पाळणाऱ्यास अपराधी मानून दंड/शिक्षा करता येईल.

भाग २ : कामाचे नियोजन व आवश्यक साधने/उपकरणे

१. घनकचरा संकलन व वाहतूक (वाहन कर्मचारी)

वाहनावरील कर्मचाऱ्यांची जबाबदारी

- दैनंदिन हजेरीसाठी नियोजित ठिकाणी व नियोजित वेळेत उपस्थित राहणे.
- गाड्यांच्या वेळापत्रकाचे/रूट मॅपचे पालन करणे
- विलगीकृत कचऱ्याचे संकलन व वाहतूक- नागरिकांकडून विलगीकृत कचरा घेणे व घंटागाडीवर पुरेशी व्यवस्था कप्पे, बकेट, पोती इ. व्यवस्था) उपलब्ध करून संकलन व वाहतूक करणे (ओला, सुका, सॅनिटरी कचरा, घरगुती घातक कचऱ्याबाबत माहितीपत्रक लावणे)
- कचरा विलगीकरणाबाबत नागरिकांना माहिती देणे व विलगीकृत कचरा देण्याबाबत आवाहन करणे
- कचऱ्याच्या संकलनाच्या नोंदी आपल्या नोंद वहीमध्ये ठेवणे
- कचऱ्याच्या सुरक्षित हाताळणीसाठी PPE चा वापर करणे
- दैनंदिन कामाचा आढावा व पुढील कामाच्या नियोजनाबाबत मुकादमांसोबत चर्चा करणे

कचरा गोळा करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणे:

- नाकाच्या अडकणीसह मुखपट्टी (मास्क)
- हातमोजे
- परावर्तित आवरण (Reflective Jacket)
- सोयीस्कर जोडे/बूट

२. प्रक्रिया केंद्रावरील कर्मचाऱ्यांसाठी:

अ. ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया:

- ओल्या कचऱ्यामधील इतर कचरा म्हणजे कागद, प्लास्टिक, धातू इ. घटक वेगळे करणे.
- कचरा श्रेडरद्वारे बारीक करून त्यामध्ये Bio-culture मिसळणे (निर्धारित प्रमाणानुसार).
- यानंतर कचरा पिट मध्ये किंवा विन्ड्रो प्लॅटफॉर्मवर ढीग करून ठेवणे .
- आवश्यकतेनुसार पाणी/ कल्चर फवारणे.
- पिटमधील कचरा दर ३-४ दिवसांनी किंवा विन्ड्रोमधील कचरा दर ७ दिवसांनी बदलणे.
- ३५-४० दिवसानंतर कचरा १६ मि. मि / २० मि. मि च्या चाळणीमधून काढून curing साठी पुढील ७-१४ दिवस ढीग करून ठेवणे.
- त्यानंतर ४ मि. मि च्या चाळणीतून काढून साठवणुकीसाठी बंदिस्त जागेमध्ये ठेवणे.

- उपकरणांची दुरुस्ती आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक माहितीयंत्र पुरविणाऱ्या agency मार्फत करून घेणे
- सुरक्षिततेच्या नियमांचे पालन आणि काळजीपूर्वक काम करणे.

ब. सुक्या कचऱ्यावर प्रक्रिया:

- MRF मध्ये कचरा आणणे आणि उतरवणे.
- कचऱ्याचे वर्गीकरण करणे
- कचऱ्याच्या वर्गवारीनुसार साठवण करणे (जसे की कागद/पुठ्ठा, प्लास्टिक, धातू, काच, कापड इ.).
- कचरा वेगळा करण्यासाठी (conveyor बेल्ट) आणि प्रक्रिया करण्यासाठी (beller/ shredder) वापरली जाणारी उपकरणे आणि यंत्रांचा योग्य वापर हाताळणी व देखभाल करणे.
- उपकरणांची दुरुस्ती आणि देखभाल करण्यासाठी आवश्यक माहिती यंत्र पुरविणाऱ्या agency मार्फत करून घेणे
- सुरक्षिततेच्या नियमांचे पालन आणि काळजीपूर्वक काम करणे.

कचरा प्रक्रियाकेंद्रावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणे:

- नाकाच्या अडकणीसह मुखपट्टी (मास्क)
- हातमोजे
- परावर्तित आवरण (Reflective Jacket)
- सोयीस्कर जोडे/बूट

३. झाडणकाम कर्मचाऱ्यांसाठी:

झाडण कामाच्या हद्दी किती असाव्यात?

	लहान शहरांसाठी	मध्यम शहरांसाठी
जास्त घनता असलेला रस्ता (प्रति व्यक्ति)	३०० ते ३५० मीटर	३०० ते ३५० मीटर
मध्यम घनता असलेला रस्ता (प्रति व्यक्ति)	३०० ते ३५० मीटर	३०० ते ३५० मीटर
कमी घनता असलेला रस्ता (प्रति व्यक्ति)	३०० ते ३५० मीटर	३०० ते ३५० मीटर

टेबल/तक्ता १ झाडण कामाच्या हद्दी

रस्त्यांचा प्रकार	झाडणकामांची वारंवारिता
शहराचा मध्यवर्ती भाग/ व्यापारी पेठा	दैनंदिन/ दिवसातून २ वेळा गरजेनुसार
बाजारपेठा	दैनंदिन
उपरस्ते	दैनंदिन
उपशहरी खरेदीची ठिकाणे	दैनंदिन
रहिवासी भागातील रस्ते	दैनंदिन
घरे किंवा इतर आस्थापना नसणारे उपरस्ते	आठवड्यातून एकदा
महामार्ग	आवश्यकतेनुसार
उपशहरी मुख्य रस्ता	आठवड्यातून २ वेळेस
रिकामे प्लॉट	आवश्यकतेनुसार (२ आठ्वड्यामधून किमान एकदा)

टेबल/तक्ता २ : झाडणकामांची वारंवारिता

उपकरणे	तपशील	तपशील
लांब हाताचा झाडू		
पंख्याच्या आकाराचा फिलामेंट झाडू	याने रस्त्यावरील कचरा, कागद, प्लास्टिक साफ होते परंतु वाळू, रेती साफ होत नाही.	• झाडूची लांबी: ८०-८५ सेंमी • झाडूचे वजन : १ किलो • Binding material: १.५-२.० सेमी रुंदी असलेली २० गेज एमएस शीट रिंग • झाडूची हाताळणी : १३५ सेंमी लांबीचा, ३-४ सेंमी व्यासाचा बांबू • बांबूहँडलचे वजन: ९०० ग्रॅम (अंदाजे)
गुच्छ केलेला फिलामेंट झाडू	रस्त्यांवरील कचरा, वाळू आणि गाळ काढण्यासाठी उपयोग होतो.	
	• झाडूने गोळा केलेले रस्त्यावरील कचऱ्याचे ढीग उचलण्यासाठी व उचलून ढकलगाडी/बकेट मध्ये टाकण्यासाठी याचा उपयोग होतो. • याव्यतिरिक्त वापरण्यात येणारे पारंपारिक साधन म्हणजे एक मोठा सरळ-पातळ फावडा किंवा धातूची प्लेट आणि धातूचा ट्रे.	

उपकरणे	तपशील	तपशील
फ्लॅट बोर्डची जोडी	• जेव्हा कचऱ्यात पानांसारख्या हलक्या पदार्थांचा मोठ्या प्रमाणात समावेश असतो, वाळलेली पाने उडण्याची शक्यता असते तेव्हा फावडा निरुपयोगी ठरतो • यासाठी एक उपाय म्हणजे फ्लॅट बोर्डची जोडी, सहसा प्लायवूडने बनलेली वापरू शकतो	
ढकलगाडी	ढकलगाडीमुळे रस्त्यावरील कचऱ्याची वाहतूक सुलभ होते.	• ढकलगाड्यांमध्ये प्रत्येकी २५ ते ४० लिटर क्षमतेचे चार ते सहा प्लास्टिक कंटेनर/ बकेट असाव्यात, जेणेकरून कचरा झाडणकाम कचऱ्याची वाहतूक करणाऱ्या वाहनामध्ये सहजपणे हस्तांतरित करता येईल. • यात निम्या उंचीपर्यंत क्रॉसबार असलेले सीलबंद बॉल बेअरिंग आणि हँडल असणे आवश्यक आहे आणि त्याच्या चाकांचा वेग नियंत्रित करण्यासाठी रबर स्ट्रिप्स असणे आवश्यक आहे.

टेबल/तक्ता ३ : झाडण कामाचे अवजारे व उपकरणे

झाडणकाम करणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी सुरक्षा उपकरणे:

- नाकाच्या अडकणीसह मुखपट्टी (मास्क)
- १३ इंची लांबीचे नायट्राईल हातमोजे
- परावर्तीत आवरण (Reflective Jacket)
- सोयीस्कर जोडे/बूट

४. गटार/नाले सफाई कर्मचाऱ्यांसाठी:

अ. नालेसफाई

नालेसफाई करतानाचे प्रमुख तीन टप्पे:

काम सुरु करण्यापूर्वी	काम करताना	काम पूर्ण केल्यावर
• सर्व व्यक्तिगत सुरक्षा उपकरणे व साधने संकलित करा • आपत्कालीन प्रथमोपचार संच नेहमी सोबत ठेवा • कामाच्या जागेला भेट द्या • कामाच्या ठिकाणाला कोंडाळे करा • व्यक्तिगत सुरक्षा उपकरणे परिधान करा	• अवजारे व उपकरणे वापरण्याचे प्राधान्य क्रम निर्धारित करा • देखरेखीखाली काम करा • केलेल्या कामांच्या नोंदी ठेवा	कामाचे ठिकाण व वापरलेले व्यक्तिगत सुरक्षा उपकरणे व साधनांची स्वच्छता करा • कोंडाळे दूर करा • निर्धारित स्थानी कचऱ्याची वाहतूक करा

टेबल/तक्ता ४ : नाले सफाई करण्याचे प्रमुख ३ टप्पे

नाले साफ करताना लागणारी अवजारे व उपकरणे	सुरक्षा उपकरणे
• ग्रॅबर मशीन (Grabber Machine) • सक्शन मशीन (Suction Machine) • दाताळे, फावडे व अन्य अवजारे	• सुरक्षा शिरस्त्राण • मुखपट्टी • सुरक्षा हातमोजे व १३ इंची नायट्राईल हातमोजे • संपूर्ण शरीर आवरण • उच्च दृश्यता असलेले परावर्तिय आवरण/Reflective Jacket • मांडी वेडर

टेबल/तक्ता ५ : नाले साफ करताना लागणारे अवजारे व उपकरणे

ब. मलकुंडाची सफाई

मलकुंडाची यांत्रिक सफाई करतानाचे प्रमुख टप्पे	मलकुंडाची सफाई करताना लागणारी अवजारे व उपकरणे	सुरक्षा उपकरणे
१. लवचिक नळी मलकुंडात सोडा २. मलकुंडात क्लोरीन सोडा ३. गाळाची सांद्रता (thickness) तपासा ४. लवचिक नळी मलकुंडाला जोडा ५. टाकी रिकामी करताना टाकीतील गाळाची पातळी तपासा ६. निर्वात टाकी पूर्ण भरल्यावर झडप बंद करा ७. टाकी साफ केल्यावर लवचिक नळीवर क्लोरीन सोडा ८. मलकुंडाची झाकणे बंद करा	• सक्शन मशीन [Gully emptier (Suction machine)] • Jetting, grabbing, rodding machine • Cesspool vehicle • Hydro Jetting machine • Rodding Machine with Flexible Sewer Rods • Bandicoot	• सुरक्षितता शिरस्त्राण • स्फोटक परिस्थितीसाठी शीर्षदीप (कंपाळावरील विजेरी) • श्वसनित्र / वायू मुखवटा • नाकाची क्लिप असलेली कणीदार मुखपट्टी • सुरक्षा चष्मे • अडथळे व सावधान पट्ट्या • डेवीट प्रणाली / सुरक्षात्मक तिपाई संच • शरीरसामग्री वायू अभिज्ञापक – ४ वायू (LEL, CO, CH3,) • विमोचन रुग्णशिबिका • पोलादी तार / काठी व लांब चाळणी • बागकामाची कात्री, दात्राकार • पाण्याची नळी / लवचिक नळी • एल आकाराचा कुंचा • प्रथमोपचार • व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे

टेबल/तक्ता ६ : मलकुंडाची यांत्रिक सफाई

मलकुंड/खड्डे साफ करणारे कर्मचारी	सुरक्षा उपकरणे
	सुरक्षा शिरस्त्राण
	मुखपट्टी
	सुरक्षा हातमोजे व १३ इंची नायट्राईल हातमोजे
	संपूर्ण शरीर आवरण
	उच्च दृश्यता असलेले परावर्तिय आवरण
	मांडी वेडर

टेबल/तक्ता ७ : मलकुंडाची यांत्रिक सफाईसाठीचे सुरक्षा उपकरणे

क. बंदिस्त जागेत सफाईसाठी प्रवेश करणे

मेंटेनन्स होल/सेप्टिक टँकमध्ये प्रवेश करताना स्वच्छता कर्मचाऱ्यांचे प्राणघातक अपघात हे निर्धारित सुरक्षा प्रक्रियेचे पालन न करणे, आवश्यक संरक्षणात्मक उपकरणे न घातल्याने, प्रशिक्षणाचा अभाव आणि पर्यवेक्षणाचा अभाव/अभावी नोंदवले गेले आहेत. जेव्हा ते मशीनच्या क्षमतेच्या पलीकडे असेल - **फक्त प्रशिक्षित स्वच्छता कामगार, योग्यरित्या सुसज्ज आणि अधिकृत, मर्यादित जागेत प्रवेश करण्यास अधिकृत केले पाहिजे, तेदेखील नियुक्त प्राधिकरणाच्या देखरेखीखाली म्हणूनच अशा प्रकारे, मर्यादित जागेत प्रवेश करण्यासाठी लिखित स्वरूपातील संबंधित अधिकाऱ्याची परवानगी असणे आवश्यक आहे** व खालील सुरक्षा उपकरणे असणे आवश्यक आहे.

व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे	इतर सुरक्षा उपकरणे	अवजारे व उपकरणे
सुरक्षितता शिरस्त्राण	अडथळे व सावधान पट्ट्या	पोलादी तार / काठी व लांब चाळणी
स्फोटक परिस्थितीसाठी शीर्षदीप (कंपळवरील विजेरी)	डेवीट प्रणाली / सुरक्षात्मक तीपायी संच	बागकामाची कात्री, दात्राकार
श्वसनित्र / वायू मुखवटा	शरीर सामग्री	पाण्याची नळी / लवचिक नळी
नाकाची क्लिप असलेली कणीदार मुखपट्टी	वायू अभिज्ञापक – ४ वायू (LEL, CO, CH3)	एल आकाराचा कुंचा
सुरक्षा चष्मे	विमोचन रुग्णशिबिका	
प्रथमोपचार	फुगवता येणारे नलिका निग	

व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे	इतर सुरक्षा उपकरणे	अवजारे व उपकरणे
इतर व्यक्तिगत सुरक्षितता उपकरणे	अक्षीय पंखा भाता	
	संपीडकासह हवा पुरवणारे श्वसन उपकरण	
	बंदिस्त सुरक्षितता वर्षण	

टेबल/तक्ता ८ बंदिस्त जागेत सफाईसाठीचे अवजारे व सुरक्षा उपकरणे

ड विष्ठाजन्य गाळाची विल्हेवाट :

१. फक्त विष्ठाजन्य गाळ प्रक्रिया संयंत्रात किंवा निर्धारित केलेल्या विल्हेवाटीच्या स्थानीच गाळाची विल्हेवाट लावा.
२. निर्धारित क्षेत्रात रहिवासी, व्यापारी किंवा औद्योगिक गाळाची विल्हेवाट लावण्यासाठी प्रक्रिया संयंत्राच्या ठिकाणी असलेल्या सूचनांचे पालन करा.
३. लवचिक नळीची फक्त एकच लांबी वापरली जाईल अशा पद्धतीने निर्वात वाहनाची जागा ठरवावी.
४. झडप/ झाकण उघडून मैलागाळ उपसून काढून घ्यावा.
५. एकदा मैलागाळ उपसून झाल्यावर झडप बंद करा.
६. मैलागाळ उपसून झाल्यावर लवचिक नळी साफ करावी.

गाळाची सुरक्षित विल्हेवाट : विष्ठाजन्य गाळाची विल्हेवाट लावण्याच्या स्थानांचे प्रकार

१. विष्ठाजन्य गाळ पक्रिया केंद्र:
विष्ठाजन्य गाळ प्रक्रिया संयंत्रात स्वच्छता प्रणालीच्या प्रत्यक्ष जागेवरून संकलित विष्ठाजन्य गाळावर प्रक्रिया करण्यात येते.

२. खोलवर चर खणून विल्हेवाट लावणे:
यामध्ये खोलवर चर खणून ते विष्ठाजन्य गाळाने भरून ते मातीने भरून टाकणे.

३. सांडपाणी प्रक्रिया केंद्रात सहप्रक्रिया:
विष्ठाजन्य गाळावर प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया संयंत्रात सहप्रक्रिया हा एक उपाय असू शकतो.

४. निर्धारित विल्हेवाटीचे स्थान:
उपरोक्तपैकी कोणत्याही प्रकारची प्रक्रिया सुविधा उपलब्ध नसल्यास निर्धारित केलेल्या स्थानी विल्हेवाट लावण्यात येईल.

१. या कृती केल्यावर पुढील अधिनियमांतर्गत कार्यवाही करण्यात यावी

महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५, उपविधीच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग ४ ब दि . १ जुलै २०१९		
	कृती	कलम
कचरा व्यवस्थापन	रस्त्यावर कचरा टाकणे	३.४७
	कचरा वर्गीकरण न करणे	५.१
	घरातून कचरा बाहेर टाकणे	३.४७
	कचरा संकलणासाठी वापरकर्ता शुल्क न देणे.	३.६४ अनुसूची १ भाग अ
	कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन	३.६४ अनुसूची १ भाग ब
	बांधकाम कचरा रस्त्यावर टाकणे	३.४७
	सार्वजनिक ठिकाणी कचरा टाकणे	४.१
	कचरा जाळणे	६.२४
	कचरा वाहतूक करण्यासाठी नगरपरिषदेची परवानगी न घेणे	३.९३
	कचरा वाहतूक करण्यासाठी नियमांचे पालन न करणे	३.९३
	आरोग्यास हानिकारक वातावरण पसरवणे	३.५७
महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५		
सांडपाणी व्यवस्थापन	सांडपाणी सार्वजनिक गटारामध्ये सोडणे	२०५
	सांडपाणी दुसऱ्याच्या हद्दीमध्ये सोडणे	२०५
	सांडपाणी व्यवस्थापनासाठी नगरपरिषदेची परवानगी न घेणे	२०४
	सांडपाणी व्यवस्थापनासाठी नियमांचे पालन न करणे	२१२

टेबल/तक्ता ९ अधिनियमंतर्गत कृतीसह कार्यवाही

२. नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी

	तक्रार	अधिनियम	कलम
सांडपाणी व्यवस्थापन	सांडपाणी सार्वजनिक गटारामध्ये सोडणे	महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५	कलम २०५
	सांडपाणी दुसऱ्याच्या हद्दीमध्ये सोडणे	महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५	कलम २०५
	सार्वजनिक पाणलोट क्षेत्राजवळ आंघोळ करणे	महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५	कलम २२१
	जनावरे धुणे	महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५	कलम २२१
	गटारीचे झाकण उघडे ठेवणे	महाराष्ट्र नागरी पुरवठा आणि गटारीकरण कायदा, १९६९	कलम ४८
अनधिकृत	बेकायदेशीर बांधकाम	महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५	कलम ३५४
	अनधिकृत पाणी जोडणी	महाराष्ट्र जलपुरवठा आणि मलनिःसारण अधिनियम, २००५	कलम २१८
	अनधिकृत जाहिरात	महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५	कलम ३२४
	रस्त्यावरील विक्रेते	महाराष्ट्र नगरपालिका (सार्वजनिक ठिकाणे) (स्वच्छता आणि नियम) उपविधी, २००९	कलम ४
अनारोग्यकर	मच्छरजन्य रोगांचा प्रसार	महाराष्ट्र रोग प्रतिबंधक आणि नियंत्रण अधिनियम, २००५	कलम १२
	प्राणी उपद्रव	महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५	कलम २९३
	ध्वनी प्रदूषण	महाराष्ट्र पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६	कलम १७
	हवा प्रदूषण	महाराष्ट्र पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६	कलम १८
	पाणी प्रदूषण	महाराष्ट्र जल प्रदूषण (नियंत्रण आणि प्रतिबंध) अधिनियम, १९७४	कलम २४
	अन्नपदार्थांची भेसळ	महाराष्ट्र अन्नपदार्थ आणि औषध प्रशासन अ	कलम १७

टेबल/तक्ता १० नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी व अधिनियम

भाग ४: महत्त्वाचे शासन निर्णय व अंमलबजावणी

१. शासन निर्णय क्रमांक - स्वमअ-२०२२/प्र.क्र.१०/नवि-३४

दिनांक - ३१-०३-२०२२

विषय - राज्यातील शहरांमध्ये सिंगलयुज प्लास्टिक बंदीच्या प्रभावी अंमलबजावणीकरिता राज्यस्तरीय व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांस्तरीय प्लास्टिक कचरा व्यवस्थापन कक्ष स्थापन करणे बाबत

नगरपालिकांच्या जबाबदाऱ्या -

a. प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम २०१६ व त्याखालील सुधारणा नियमांची प्रभावी अंमलबजावणी करणे आणि राज्यातील सिंगल यूज प्लॅस्टिक (एसयूपी) चा वापर टप्याटप्याने बंद करणे.

b. सिंगल यूज प्लॅस्टिक (एसयूपी) ला पर्यायी साधनांची निश्चिती करून त्याचा वापर करण्यास प्रोत्साहित करणे.

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -

- प्लॅस्टिक वापर करणाऱ्यास दंड करणे, माल जप्त करणे.
- जप्त केलेल्या मालाचे तपशील संबंधित अधिकारी /मुख्याधिकारी यांना देणे

मुकादमच्या जबाबदाऱ्या-

- प्लॅस्टिक वापर करणाऱ्याबाबतची माहिती वरिष्ठांच्या निदर्शनास आणणे.
- दंड करणेकामी मदत करणे, जप्त केलेल्या मालाची वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली विल्हेवाट लावणे.

२. शासन निर्णय क्रमांक- स्वमअ-२०१७/प्र.क्र.१२६/नवि - १४

दिनांक - ११/०७/२०१९

विषय - राज्यातील महानगरपालिका / नगरपरिषदा / नगरपंचायतींमध्ये घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी लागू करण्याबाबत.

नगरपालिकांच्या जबाबदाऱ्या -

- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम , 1949 च्या कलम 450(अ) तसेच, महाराष्ट्र
- नगरपरिषदा, नगरपंचायती आणि औद्योगिक नगरी अधिनियम , 1965 च्या कलम 312(अ) अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून, शासनाने घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी), स्वच्छता व आरोग्य उपविधी विहीत केले आहेत.
- उपविधी लागू करण्यासाठी महानगरपालिका/ नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या ठरावाची वा स्वतंत्र मान्यतेची आवश्यकता असणार नाही.
- सदर उपविधीची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी संबंधित महानगरपालिका आयुक्त व मुख्याधिकारी, नगरपरिषदा/ नगरपंचायती यांची असेल.

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -

उपविधीची काटेकोर अंमलबजावणी करणे.

मुकादमच्या जबाबदाऱ्या -

उपविधीच्या अंमलबजावणी करणेसाठी वरिष्ठांना मदत करणे.

३. शासन निर्णय क्रमांक-स्वमअ-२०२२/प्र.क्र.७३/नवि-३४

दिनांक - १५/०७/२०२२

विषय - केंद्र शासनाच्या स्वच्छ भारत अभियान (नागरी) २.० च्या धतीवर राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) २.० राबवण्याबाबत.

नगरपालिकांच्या जबाबदऱ्या -

- शाश्वत घन कचरा व्यवस्थापन (Sustainable Solid Waste Management)
- शाश्वत स्वच्छता (Sustainable Sanitation).
- शाश्वत स्वच्छता आणि वापरलेल्या पाण्यावर प्रक्रिया (Sustainable sanitation and treatment of used water)

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -

- शहरातील कचऱ्याचे १००% संकलन करून त्याची विल्हेवाट शास्त्रोक्त पद्धतीने लावणे,
- पूर्ण प्लास्टिक बंदीची अंमलबजावणी करणे,
- शहराचा हागणदारी मुक्त दर्जा कायम ठेवणे,
- सांडपाण्यावर प्रक्रिया होईल याकडे लक्ष देणे.
- हाताने मैला हाताळण्याच्या पद्धती (manual scavanging) बंद करणे व यांत्रिक पद्धतींचा अवलंब करणे

मुकादमच्या जबाबदाऱ्या -

वरील नियमांची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे

४. शासन निर्णय क्रमांक-स्वमअ २०१७/प्र.क्र.६०/नवि -34

दिनांक- २७/०४/२०१७

विषय - स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये दिनांक १ मे, २०१७ पासून "घनकचरा विलगीकरण मोहिम" (at source waste segregation) राबविण्याबाबत.

नगरपालिकांच्या जबाबदऱ्या -

- जनजागृतीसाठी- सोशल मिडियाचा वापर, शहरातील सामाजिक संस्था, अशासकीय संस्था, शैक्षणिक व आरोग्य संस्था, स्वयं-सहाय्यता गट, युवक संघटना, रहिवासी व बाजार संघटना, व्यवसायिक व औद्योगिक संस्था इत्यादींना सहभागी करून घेण्यात यावे.

• सर्व आस्थापनांमध्ये (रहिवासी, व्यावसायिक, औद्योगिक,शासकीय, सामाजिक, फेरीवाले इ.) निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याचे विलगीकरण करण्याची जबाबदारी संबंधित कचरा निर्माण करणाऱ्यांची आहे. त्यांच्यावरील सदर जबाबदारीबाबत उपरोक्त सर्व संस्थांना/सर्वांना अवगत करण्यात यावे व त्यानुसार कचरा विलगीकरणाची कार्यवाही करण्यात यावी.

• कचरा निर्माण होणाऱ्या प्रत्येक ठिकाणी ओला, सुका व घरगुती घातक कचरा यासाठी स्वतंत्र डबे (Dust Bins) ठेवण्यात यावेत, (स्वतंत्र डबे (Dust Bin) अनुक्रमे हिरव्या, निळ्या व लाल रंगाचे ठेवण्यात यावेत. स्वतंत्र डब्यांचा (Dust Bins) खर्च CSR निधीतून करण्यात यावा.

• झाडणकामाचा व बागकामाचा कचरा विलगीकरण करून स्वतंत्रपणे संकलित करावा .

• विलगीकरण केलेल्या घनकचऱ्याचे संकलन व वाहतूक करणे (Collection of Municipal Solid Waste):

शहरात निर्माण होणाऱ्या घनकचऱ्याच्या संकलनाची जबाबदारी संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे.यासाठी घंटागाडीवर पुरेशी व्यवस्था असणे आवश्यक आहे.

१००% वर्गीकृत कचरा संकलन व वाहतुकीसाठी ट्रॅकिंगसाठी GPS यंत्रणा, घंटागाडीचे वेळापत्रक लावणे व याबाबत नागरिकांना विविध उपलब्ध माध्यमांतून माहिती देणे, प्रभागनिहाय / घंटागाडीनिहाय स्वच्छता दूताची नेमणूक करणे

• घनकचऱ्यावरील प्रक्रिया (Processing of Solid Waste): शहरातील ओला, सुका व घरगुती घातक कचऱ्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करणे.

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -

कचरा वर्गीकरणासाठी नागरीकांचे प्रबोधन करण्यासाठी बॅनर, फ्लेक्स, पथनाट्य इ. चा वापर करणे. यासाठी बचत गट, शिक्षण संस्था, औद्योगिक संस्था, रहिवासी कॉलनी, व्यापारी संस्था इ. चा सहभाग घेणे.

कचऱ्याचे वर्गीकरण ओला, सुका व घरगुती घातक कचरा अनुक्रमे हिरवा, निळा व लाल कचरापेटीचा वापर करने. या परिपत्रकामध्ये नमूद बाबींचे प्रबोधन करणे.

मुकादमच्या जबाबदाऱ्या -

याकामी वरिष्ठांना मदत करणे.

५. शासन निर्णय क्रमांक-स्वमअ २०१७/प्र.क्र.५३/नवि -34

दिनांक- २७/०४/२०१७

विषय - राज्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यक्षेत्रामध्ये घनकचऱ्यापासून तयार होणाऱ्या खताची विक्री करण्यासाठी "हरित महासिटी कंपोस्ट" हा ब्रँड वापरण्यास परवानगी देण्याबाबत.

नगरपालिकांच्या जबाबदऱ्या -

(१) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे विलगीकरण करून त्यापैकी विघटनशील (Biodegradable) (ओला कचरा व सुका पालापाचोळा) कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करून सेंद्रिय खताची निर्मिती केलेली असावी.

(२) तयार केलेल्या सेंद्रिय खताचे राज्यशासनाने प्राधिकृत केलेल्या प्रयोगशाळामार्फत वेळोवेळी परीक्षण करून घेऊन या परिक्षणात अहवाल सकारात्मक आल्यानंतरच संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस "हरित महासिटी कंपोस्ट" हा ब्रँड वापरता येईल.

अ .क्र	प्रयोगशाळेचे नाव	कार्यक्षेत्रातील जिल्हे
१	खत नियंत्रक प्रयोगशाळा, पुणे	पुणे, अहमदनगर, सोलापूर, लातूर, धाराशिव
२	खत नियंत्रक प्रयोगशाळा, कोल्हापूर	सातारा, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
३	बंदिस्त सुरक्षितता वर्षण	नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव ठाणे, पालघर, रायगड
४	खत नियंत्रक प्रयोगशाळा, छत्रपती संभाजीनगर	छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली
५	खत नियंत्रक प्रयोगशाळा अमरावती	वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, अमरावती, अकोला, वाशीम, बुलढाणा, यवतमाळ

टेबल/तक्ता ११ अधिकृत खत परीक्षण प्रयोगशाळा

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -

ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यासाठी कर्मचाऱ्यांना योग्य प्रशिक्षण देणे व वेळोवेळी पाहणी करून मार्गदर्शन करणे. खताचा नमुना तयार करून घेऊन वरिष्ठांच्या सल्ल्याने तपासणीसाठी देणे.

मुकादमच्या जबाबदाऱ्या -

कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख करणे, व प्रक्रियेमध्ये काही अडचणी असल्यास वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे.

६. शासन निर्णय क्रमांक- स्वमअ २०१८/प्र.क्र.२१२/ नवि -३४

दिनांक-२७/०४/२०१८

विषय - स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंतर्गत राज्यातील शहरातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्याबाबत.

नगरपालिकांच्या जबाबदाऱ्या -

• शहरात दररोज निर्माण होणाऱ्या १००% विलगीकृत घनकचऱ्याचे घरोघरी (door to door) जाऊन संकलन व वाहतूक, ओल्या कचऱ्यावर शास्त्रोक्त पद्धतीने प्रक्रिया करण्यात यावी व सुक्या कचऱ्याचे पुनश्च विलगीकरण करून तो पुनर्प्रक्रिया करण्यासाठी पाठविण्यात यावा.

• प्रक्रिया होऊ न शकणारा उर्वरित सुका कचरा भरावभूमीवर पाठविण्यात यावा. (प्रमाण <१५% ते २०% एकूण सुका कचरा)
• FCO Norms नुसार सदर कंपोस्ट खताची तपासणी करून "हरित महा सिटी कंपोस्ट" ब्रँड मिळवणे
• एकूण ओल्या कचऱ्यापासून १५-२०% कंपोस्ट खत तयार होणे अपेक्षित आहे,शहरात दररोज निर्माण होणाऱ्या ओल्या कचऱ्यापासून तयार होणाऱ्या कंपोस्टबाबत केंद्र शासनाच्या mFMS (Mobile Fertilizer Monitoring System) पोर्टलवर नोंदणी (Registration) करण्यात यावी.

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -
वरील कामांची पूर्तता वरिष्ठांच्या साहाय्याने करणे.

मुकादमच्या जबाबदाऱ्या -
कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख करणे व काही अडचणी असल्यास वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे.

७. शासन निर्णय क्रमांक- संकीर्ण-२०१६/प्र.क्र.२५९ /नवि-३३

दिनांक-३०/११/२०१७
विषय - नागरी भागातील सांडपाणी प्रक्रिया पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण निश्चित करणेबाबत.

नगरपालिकांच्या जबाबदाऱ्या -
• सांडपाणी व्यवस्थापन क्षमता निर्माण करून त्याचे पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करणेबाबत आराखडा तयार करून शासनाच्या विविध योजनांमधून निधीच्या उपलब्धतेनुसार त्याची अंमलबजावणी करणे
• **पारंपारिक व नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा वापर :** शहरामध्ये निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर द्वितीय व तृतीयस्तरीय प्रक्रिया करण्याच्या अनुषंगाने करावयाच्या प्रकल्पांची अंमलबजावणी करताना पारंपारिक तंत्रज्ञानाबरोबरच **आय.आय.टी. / निरी** यांच्यामार्फत विकसित केलेल्या नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानांचा उपयोग प्राधान्याने करण्यात यावा.
• संपूर्ण सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी आवश्यक असलेली सांडपाणी प्रक्रिया क्षमता (STP) पहिल्या टप्यात निर्माण (१००% treatment Capacity) करण्यात यावी. यामध्ये ट्रंकमेन, पंपिंग स्टेशन, मलशुध्दीकरण केंद्र व नालाबंध यांचा समावेश असेल. त्यासोबत त्या शहरातील एकूण वेगवेगळ्या प्रभागापैकी काही प्रभागातील सांडपाणी गोळा करण्याची व्यवस्था (Collection System) देखील घेण्यात यावी.
• उर्वरीत प्रभागाकरिता मुख्य वाहिनीद्वारे (Trunk Main) सांडपाणी एका नाल्यात एकत्रित करण्यात यावे व असा नाला मलशुध्दीकरण केंद्राजवळ (STP) अडवून (Nala Interception) त्याठिकाणी असे सांडपाणी मलशुध्दीकरण केंद्रामध्ये घेऊन त्यावर प्रक्रिया करण्यात यावी.
• दुसऱ्या टप्यामध्ये मलवाहिन्यांची व्यवस्था निर्माण करण्यात येऊन प्रथम टप्प्यामध्ये निर्माण केलेल्या मलप्रक्रिया व्यवस्थेस जोडण्यात यावी. या टप्यात द्वितीयस्तरीय मलवाहिन्यांचा समावेश असेल.

● सांडपाणी पुनर्वापर प्राधान्य (Priority of Reuse) :

१. औष्णिक विद्युत केंद्रांना प्रक्रियायुक्त पाणी पुरविणेसाठी पुनर्वापर.
२. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ अंतर्गत औद्योगिक क्षेत्रांना प्रक्रियायुक्त पाणी पुरविण्यासाठी पुनर्वापर.
३. रेल्वे किंवा अन्य बल्क बायर्सना प्रक्रियायुक्त पाणी पुरविण्यासाठी पुनर्वापर.
४. कृषि प्रयोजनार्थ पाणी पुनर्वापर.
५. पिण्यायोग्य नसलेल्या (Non-Potable) घटकांसाठी पाण्याचा पुनर्वापर (महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकानुसार).

● प्रक्रियायुक्त पाणी वापर बंधनकारक:-

१. ५० कि.मी परिघातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिक्षेत्रातील उद्योगांना बंधनकारक
२. राज्यातील ऊर्जा प्रकल्पांना १०० कि.मी. परिघातील प्रक्रियायुक्त पाणी वापरण्याचा विकल्प)

● प्रक्रियायुक्त पाणी वापर बंधनकारक:-

१. ५० कि.मी परिघातील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिक्षेत्रातील उद्योगांना बंधनकारक
२. राज्यातील ऊर्जा प्रकल्पांना १०० कि.मी. परिघातील प्रक्रियायुक्त पाणी वापरण्याचा विकल्प)

● सांडपाणी पुनर्वापर वित्तिय हक्क :-

सदर धोरणानुसार राज्यातील नागरी स्थानिक स्वराज संस्थांमार्फत प्रक्रिया करण्यात आलेले पाणी नैसर्गिक स्रोतांमध्ये सोडल्यास व सदर स्रोताच्या काठावर शहराच्या खालच्या बाजूस असलेली अन्य गावे /शहरे / शासकीय विभाग/यंत्रणा सदर पाण्यापासून व्यापारी तत्वावर नफा कमवित असल्यास सदर नफ्याच्या पूर्ण रकमेवर प्रक्रिया करणाऱ्या नागरी स्थानिक स्वराज संस्थेचा वित्तीय हक्क असेल.

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -

वरील कामांची पूर्तता वरिष्ठांच्या साहाय्याने करणे.

मुकादमच्या जबाबदाऱ्या:

कर्मचाऱ्यांच्या कामावर देखरेख करणे, व काही अडचणी असल्यास वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे.

८. शासन निर्णय क्रमांक-MAHBIL/२००९/३७८३१

दिनांक- ०१/०७/२०१९

विषय - User Charges (वापरकर्ता शुल्क) बाबत

नगरपालिकांच्या जबाबदऱ्या -

• उपयोगकर्ता शुल्क : कचरा व्यवस्थापन सेवा दिल्यापोटी अनुसूची-1 मध्ये व वेळोवेळी नमूद दराने नागरी स्थानिक संस्था घरगुती/आवारांकडून उपयोगकर्ता शुल्क वसूल करू शकतील.

• प्रत्येक घर/अंगण/ आवार येथील कचरा संकलन करण्यासाठी वेळ निर्धारित करणे आवश्यक आहे. सर्वसाधारणपणे सदर वेळ ही सकाळी ७-०० ते ११-०० अशी असावी, परंतु गरजेप्रमाणे यात बदल करावा.

• व्यावसायिक आस्थापना /दुकाने/बाजारपेठ ह्या ठिकाणी कचरा संकलन हे सर्वसामान्यपणे सकाळी ९-०० ते १२-०० पर्यंत करण्यात यावे. परंतु गरजेप्रमाणे यात बदल करावा.

• सोबत जोडलेले दारोदारी किंवा बिंदूवार कचरा संकलन करण्याचे शुल्क हे प्रत्येक प्रभाग/विभागातील प्राधिकृत व्यक्ती/संस्था करतील.

• विहित दर हे नगरपरिषद/नगरपंचायतीच्या वतीने रीतसर प्रसिद्ध करण्यात यावेत व कचरा व्यवस्थापन वाहनावरसुद्धा प्रदर्शित करण्यात यावेत.

• प्राधिकृत संस्था/व्यक्ती हे कचरा व्यवस्थापन वाहनावरसुद्धा सोबत जोडलेले दारोदारी किंवा बिंदूवार कचरा संकलन करण्याचे शुल्क हे प्रत्येक प्रभाग/विभागातील प्राधिकृत व्यक्ती/संस्था यांचे नाव लिहितील.

घरे व आस्थापनांच्यांमधून कचरा संकलन करण्यासाठी दर / उपयोगकर्ता शुल्क/दर खालीलप्रमाणे आहेत.

अनुसूची १

भाग-अ : उपयोगकर्ता शुल्क

घरे व अस्थापनन कचरा संकलन करण्यासाठी दर/उपयोगकर्ता शुल्क/दर खालीलप्रमाणे आहेत :

अ .क्र	वर्गवारी	नगर परिषद (अ) व (ब)	नगरपरिषद (क)/ नगरपंचयात
	घनकचरा निर्मिती १०० किलोग्राम पेक्षा कमी		
१	प्रति घर	३०	१५
	व्यवसायिक आस्थापना		
२	दुकान दवाखाने इत्यादी	४५	३०
३	शोरूम (उपकरणे/फर्निचर/ऑटोमोबाइल/ इलेक्ट्रॉनिक्स इ.)	८०	६०

अ .क्र	वर्गवारी	नगर परिषद (अ) व (ब)	नगर परिषद (क)/ नगरपंचयात
४	गोदाम	८०	६०
५	उपहारगृहे व हॉटेल	८०	६०
६	राहण्याची व जेवणाची व्यवस्था असणारी हॉटेल	१००	८०
	रुग्णालये		
७	पन्नास खाटांपेक्षा कमी	८०	६०
८	पन्नास खाटांपेक्षा जास्त	१२०	९०
	संस्था		
९	शैक्षणिक संस्था, वसतिगृहे	६०	४५
१0	धार्मिक संस्था	६०	४५
११	शासकीय / निम्नशासकीय कार्यालय	६०	४५
१२	विवाह कार्यालय/मनोरंजन सभागृहे/ एक पडदा चित्रपटगृहे	२००	१५०
१३	खरेदी केंद्र/बहुपडदा चित्रापटगृहे	१२०	९०
१४	फेरीवाले	१२०	९०
१५	पर्यटन स्थळी घोड्याची लीद	३००	२००
१६	हंगामी दुकाने किवा आनंदी मेळा / सत्संग / खाद्य महोत्सव / फटाक्याचे दुकान	स्थानिक स्वराज्य संस्थांनी मासिक शुल्क न आकारता एक वेळ शुल्क निर्धारित करावे	

टीप. - उपरोक्त दर हे दरवर्षी ५% वाढविण्यात यावेत

टेबल/तक्ता १२ कचरा संकलन करण्यासाठीचे शुल्क

भाग-ब : (शिस्तीची अनुसूची)

कचरा फेकणे, उपद्रव निर्माण करणे व स्वच्छ अंगण उल्लंघन केल्यापोटी (किमान शिस्त रुपयांमध्ये)

अ .क्र	वर्गवारी	नगर परिषद (अ) व (ब)	नगरपरिषद (क)/ नगरपंचयात
	विलगीकरण, साठवणूक,वितरण व संकलन याबाबतचे उलंघन		
१	विलगीकरण न केलेला व वेगळ्या डब्यांमध्ये साठवण न केलेला कचरा सोपवण्याबद्दल :		
	(अ) घरातून / व्यावसायिक आस्थापना		
	पहिला प्रसंग	२००	१००
	नंतर प्रत्येक प्रसंगी	५००	३००
	(ब)मोठ्या प्रमाणावरील कचरा निर्माण करणारे जनक		
	पहिला प्रसंग	१०००	५००
	नंतर प्रत्येक प्रसंगी	३०००	१५००
२	कचरा जाळण्याबद्दल	५०००	५०००
	विशिष्ट वर्गवारी / परिस्थिती		
३	सार्वजनिक सभा संपल्यावर चार तासांच्या आत स्वच्छता न केल्याबधल	स्वच्छता अनामत रक्कम जप्त करणे	

टेबल/तक्ता १३ प्रसंग व दंड आकारणी

स्वच्छता निरीक्षकांच्या जबाबदाऱ्या -

वरील कामी दंड वसुली सेवा शुल्क वसुली इ. करणे.

मुकादमच्या जबाबदाऱ्या:

याकामी वरिष्ठांना मदत करणे.

भाग ५ : विविध योजना व त्यांची पूरक माहिती

अ. योजनांचे लाभ व पात्रता

योजनेचे नाव	योजनेची माहिती	लाभ	पात्रता	आवश्यक दस्तवेज
इ – श्रम पत्रिका https://eshram.gov.in/ कामगार विभाग	सर्व बिगरसंघटित कामगारांचा केंद्रीकृत माहितीसाठा निर्माण करून तो आधार कार्डाशी बीजन/लिंक करणे.	१. रु २,००,००० अपघात विमा(पंतप्रधान सुरक्षा विमा योजने अंतर्गत मोफत) २. विविध शासकीय कल्याण योजनांच्या सामाजिक सुरक्षा लाभ	अर्जदार वय-१६ – ६०	१. आधार क्रमांक लाभार्थ्याच्या नावाने बँक खाते लाभ घेण्यासाठी कोणतेही अधिमूल्य भरण्याची गरज नाही
प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) (PMAY - U) https://pmayg.nic.in/netiayHome/home.aspx (सार्वजनिक / खासगी क्षेत्रातील कोणतीही बँक)	भारत सरकारची एक योजना आहे जी शहरी भागात घरे खरेदी करण्यासाठी किंवा बांधण्यासाठी आर्थिक सहाय्य प्रदान करते.	पात्र शहरी भागातील कुटुंबांना घर घेण्यासाठी पाठबळ	१. भारताचे नागरिक असणे आवश्यक आहे. असल्याच्या मापदंड २. कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न ₹ ८ लाख (सर्वसाधारण श्रेणी) किंवा ₹ १२ लाख पेक्षा जास्त नसावे ३. कुटुंबाकडे स्वतःचे घर नसावे	१. आधार कार्ड २. रहिवासी दाखला ३. उत्पन्न दाखला ४. जात प्रमाणपत्र (जर लागू असेल) ५. बँक खाते पासबुक ६. पासपोर्ट आकाराचे फोटो
पंतप्रधान उज्ज्वला योजना (PMUY) https://www.pmuy.gov.in/ujjwala2.html कोणताही वितरक	स्वयंपाकाच्या गॅसची (द्रविकृत पेट्रोलियम वायू / LPG) मोफत जोडणी देणारी शासनाची मुख्य योजना	दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांच्या नावाने द्रवीभूत पेट्रोलियम वायूची जोडणी	१. वय १८ वर्षे पेक्षा जास्त (दारिद्र्य रेषेखालील महिला असणे आवश्यक आहे.) २. अर्जदार महिलेचे देशातील राष्ट्रीयीकृत बँकेच्या कोणत्याही शाखेत बचत खाते असणे आवश्यक आहे. ३. अर्जदाराच्या कुटुंबात अन्य कोणाच्याही नावाने द्रवीभूत पेट्रोलियम वायूची जोडणी नसावी	१. पंचायतीचे प्रमुख / नगरपालिकेचे अध्यक्षांनी प्राधिकृत केलेले दारिद्र्य रेषेखालील प्रमाणपत्र दारिद्र्य रेषेखालील शिधा पत्रिका २. छायाचित्र ओळखपत्र (आधार कार्ड किंवा मतदार ओळखपत्र) पारपत्र आकाराचे अलीकडील एक छायाचित्र
पंतप्रधान प्रत्येक घरी सहज वीज योजना –" सौभाग्य " योजना https://www.jansuraksha.gov.in/files/pmjjby/English/applicationform.pdf बँक	या योजनेअंतर्गत ग्रामीण तसेच शहरी उर्वरित भागातील सर्व वीजपुरवठा नसलेल्या कुटुंबांना वीज जोडणीद्वारे सोय उपलब्ध करून देण्यात येते	विजेची जोडणी नसलेल्या सर्व घरांसाठी	१. भारतातील कोणताही नागरिक या योजनेसाठी पात्र आहे. २. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ₹ २ लाख पर्यंत असावे. ३. अर्जदाराकडे स्वतःची किंवा भाड्याने घेतलेली जमीन असावी.	१. आधार कार्ड २. निवासस्थानाचा पुरावा ३. वीज कनेक्शनसाठी अर्ज ४. उत्पन्नाचा पुरावा (जर आवश्यक असेल

योजनेचे नाव	योजनेची माहिती	लाभ	पात्रता	आवश्यक दस्तवेज
पंतप्रधान जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY) https://saubhagya.gov.in/ http://bit.ly/3z63xUp	सदर योजना ही एक वर्ष मुदत असलेली कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास जीवन विमा कवच योजना असून दरवर्षी नूतनीकरण करता येते.	-एक वर्ष मुदतीची जीवन विमा योजना -कोणत्याही बँकेत खाते असलेली कोणतीही व्यक्ती सदर योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहे.	वय वर्षे १८- ७० -कोणत्याही बँकेत खाते असलेली कोणतीही व्यक्ती सदर योजनेसाठी अर्ज करण्यास पात्र आहे.	१. बँकेत बचत खाते- वार्षिक अधिमूल्य आपल्या खात्यातून दरवर्षी वसूल करण्यात येईल . वार्षिक अधिमूल्य : ₹ ४३६
पंत प्रधान सुरक्षा बिमा योजना (PMSBY) http://www.jansuraksha.gov.in/Forms-PMSBY.aspx बँक	अपघाती विमा कवच	अपघाती मृत्यू आणि अपंगत्व आल्यास रु २.०० लाख रकमेचे विमा कवच	१. वयोगट १८ – ७० व बँक खातेदार एका खात्यातील एकच व्यक्ती विम्यासाठी पात्र राहील.	१. आधार जोडणी असलेले सक्रीय बचत खाते 2.कोणत्याही बँकेतील बचत खातेधारक . वार्षिक अधिमूल्य खात्यातून थेट वसूल करण्यात येईल . अधिमूल्य : दरवर्षी ₹ २०
अटल निवृत्तीवेतन योजना (APY) https://www.india.gov.in/spotlight/atal-pension-yojana	सदस्यांना मासिक पेन्शन	दरमहा रु १००० ते रु ५००० पर्यंत निवृत्ती वेतन	१८ ते ४० वयोगटातील सर्व व्यक्तीना वयाच्या ६० वर्षेपर्यंत रकमेचे योगदान भरणा करावा लागेल .	१. आधार जोडणी असलेले, सक्रीय बचत खाते २. अटल निवृत्तीवेतन योजनेचा अर्ज 3. आधार क्रमांक
पंतप्रधान जनधन योजना (PMJDY) https://pmjdy.gov.in/hi-scheme	ही भारताची एक आर्थिक क्षेत्राची वित्तीय समावेशन योजना आहे ज्याद्वारे,बँक बचत व जमा खाते,प्रदान, जमा करणे विमा व पेन्शन या आर्थिक सेवा एकाच परवडणाऱ्या रितीने हाताळता येतात.	वित्तीय सेवांना सहज लाभ	१. किमान वय – १० वर्षे समाजाच्या दुर्बल घटकातील कोणतीही व्यक्ती २. शून्य शिल्लक रक्कम खाते	१. ओळखपत्र पुरावा २. पत्याचा पुरावा (Proof of address)
पंतप्रधान जन आरोग्य योजना (PM-JAY) https://mera.pmjay.gov.in/search/login https://bit.ly/3FQURVS	शासकीय आरोग्य विमा योजना प्रत्येक कुटुंबाला दरवर्षी रु ५.०० लाख रकमे पर्यंत दुय्यम व तिय्यम रुग्णालयातील उपचारांसाठी विमा कवच पुरवते	प्रत्येक कुटुंबाला रक्कम रु ५.०० लाख पर्यंत विमा कवच	१. सामाजिक-आर्थिक जात जनगणना 2011 मध्ये उपस्थित असलेल्या व्यावसायिक श्रेणीतील शहरी कामगारांच्या कुटुंबांना फायदा होईल. २. सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जनगणना सूचीमध्ये नाव असणे आवश्यक ३. राष्ट्रीय विमा स्वास्थ्य योजनेत समाविष्ट , पण सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक जनगणनेत समाविष्ट नसलेले	१. ओळखीचा पुरावा : आधार कार्ड २. निवासाचा पुरावा : शिधा पत्रिका (स्वतःची) ३. आजार व उपचाराचा पुरावा : वैद्यकीय अहवाल

योजनेचे नाव	योजनेची माहिती	लाभ	पात्रता	आवश्यक दस्तवेज
पंतप्रधान मातृ वंदना योजना https://pmmvy-cas.nic.in/backoffice/useraccount/login?ReturnUrl=%2Fbackoffice%2Fhome%2F	कुटुंबात पहिल्या बालकासाठी त्यांच्या गरोदर महिला व स्तन्यदा मातांच्या बँक / टपाल कचेरीतील खात्यात प्रोत्साहनपर रक्कम रु ५००० रोख स्वरुपात जमा करण्यात येईल	गरोदर व स्तन्यदा मातांसाठी सशर्त रोख अंतरण अंगणवाडी किंवा कोणतेही शासकीय सार्वजनिक आरोग्य केंद्र	गरोदरपणाची नोंदणी नवजात बालकाची तपासणी केलेली असावी संस्थागत जन्म २. केंद्र / राज्य शासनाची / सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाची कर्मचारी नसावी	१. गरोदरपणाचा नोंदणी क्रमांक कोणताही ओळखीचा पुरावा २. बँक खाते ३. आधार कार्ड ४. जन्म नोंदणी दाखला ५. बालकाची लसीकरण पत्रिका
स्वच्छ भारत अभियान - शहरी	कुटुंबस्तरावर (व्यक्तिगत) शौचालयाचे बांधकाम	कौटुंबिक व्यक्तिगत शौचालयाचे बांधकाम	सर्व भारतीय नागरिक कौटुंबिक व्यक्तिगत शौचालय योजनेसाठी पात्र आहे	१. व्यक्तिगत शौचालय बांधणीसाठी अर्ज २. आधार कार्ड ३. रहिवासी दाखला ४. जात प्रमाणपत्र ५. उत्पन्न दाखला ६. बँक खाते पासबुक
पंतप्रधान रोजगार निर्मिती योजना (PMEGP) https://msme.gov.in/1-prime-ministers-employment-generation-programme-pmegp	स्वयंरोजगाराच्या संधीसाठी कर्ज देण्यात येते	स्वयंरोजगाराचे उपक्रम स्थापित करून रोजगाराच्या संधी व्युत्पन्न करणे	१८ वर्षे वयावरील कोणीही व्यक्ती . उत्पादन क्षेत्रात रु १० लाख पेक्षा जास्त व व्यापार / सेवा क्षेत्रात रु ५ लाख पेक्षा जास्त रकमेचा प्रकल्प स्थापित करण्यासाठी लाभार्थी किमान ८वी इयत्ता उत्तीर्ण असणे आवश्यक आहे	१. अर्जदाराच्या छायाचित्राची क्रमविक्षित प्रत (अनिवार्य) २. बँक खात्याचे तपशील ३. आधार कार्ड ४. (PAN) कार्ड ५. प्रकल्प अहवाल ग्रामीण भाग प्रमाणपत्र ६. शिक्षण / कौशल्य विकसन प्रशिक्षण प्रमाणपत्र प्राधिकृतता पत्र
स्वच्छता उद्यमी योजना – “ स्वच्छतेतून संपन्नतेकडे ” https://nskfdc.nic.in/en/node/add/loan-application क्षेत्रीय ग्रामीण बँक अथवा कोणतीही राष्ट्रीयीकृत बँक	सार्वजनिक खासगी पद्धतीने सशुल्क शौचालयाच्या बांधकाम, परिचालन व देखभालीसाठी व स्वच्छतेशी संबंधित वाहनांचे प्रापण व परिचालणासाठी वित्तीय सहाय्य देण्यात येते	सफाई कर्मचारी व मुक्त झालेल्या मेहेतर कामगारांच्या उपजीविकेची तरतूद करण्यासाठी	व्यक्तिगत लाभार्थी व त्यांच्यावरील अवलंबित व्यक्ती / नामवंत संघटनांशी सहयोग असणारे स्वयंसहाय्य बचत गट. हाताने विष्ठा साफ करणाऱ्या व्यक्ती / सफाई कर्मचाऱ्यांचे लक्षित गट व त्यांच्यावरील अवलंबित	१. अर्जदाराच्या छायाचित्राची क्रमविक्षित प्रत (अनिवार्य) २. बँक खात्याचे तपशील (अनिवार्य) ३. बँकेच्या खाते पुस्तिकेच्या पहिल्या पृष्ठाची क्रमविक्षित प्रत (अनिवार्य) ४ आधार कार्डाचा क्रमांक

योजनेचे नाव	योजनेची माहिती	लाभ	पात्रता	आवश्यक दस्तवेज
राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ (NSKFDC) https://nskfdc.nic.in/	सफाई कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून व्यक्तींना सामाजिक व आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी करून त्यांना प्रतिष्ठेने जगता येऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात त्यांना सहभागी करून घेणे	कोणत्याही व्यवहार्य उत्पन्न निर्मिती करणाऱ्या गटाला आर्थिक सहाय्य (सहाय्यासाठी पात्रता ही जात आधारित नसून व्यवसाय आधारित आहे.)	१. अर्जदाराचे वय १८ ते ५५ वर्षांच्या दरम्यान असावे . २. यथोचित सर्वेक्षणातून निर्धारित मेहेतर किंवा सफाई कर्मचारी व त्यांच्यावरील अवलंबित . ३. वित्तीय साहाय्य घेण्यासाठी उत्पन्नाची कोणतीही मर्यादा विहित केलेली नाही	१.कोणत्याही राजपत्रित अधिकाऱ्याने जारी केलेले सफाई कामगार असल्याचे प्रमाणपत्र २. जन्म दाखला / शाळा सोडल्याचा दाखला . ३. १५ वर्ष निवासाचे प्रमाणपत्र ४. शिधापत्रिकेची प्रत ५ दोन छायाचित्रे ६. प्रकल्पानुसार संबंधित अन्य दस्तऐवज
पंतप्रधान दक्षता व कुशलता संपन्न हितग्राही योजना (DAKSH) https://pmdaksh.dosje.gov.in/	सशुल्क शौचालयांचे बांधकाम, संचालन आणि देखभाल आणि सार्वजनिक खाजगी पद्धतीने स्वच्छता संबंधित वाहने खरेदी आणि चालवण्यासाठी आर्थिक सहाय्य प्रदान केले जाते.	स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या विविध (जातीय) लक्षित गटांच्या क्षमतेच्या स्तरात सर्वांगीण सुधारणा करणे	१. अनुसूचित जाती, अन्य मागासवर्गीय, ज्येष्ठ नागरिक, दारूच्या व्यसनाचे बळी, पारलिंगी व्यक्ती, विमुक्त जमाती, आर्थिकदृष्ट्या मागास वर्ग, सफाई कर्मचारी कचरा वेचक व मेहतर २. १८ – ४५ वर्षे	१. जात प्रमाणपत्र २. रु १ ते ३ लाखाच्या दरम्यान उत्पन्न असल्याचे जारी केलेले उत्पन्न प्रमाणपत्र

टेबल/तक्ता १४ समाज कल्याण योजना

ब. आवश्यक दस्तावेज

मुलभूत दस्तऐवज	दस्तऐवज प्राप्त करण्यासाठी सुचविलेले स्त्रोत
आधार कार्ड	https://uidai.gov.in/ संकेतस्थळाद्वारे वेळ व दिवस निर्धारित करा आणि भारत सरकारच्या कोणत्याही प्राधिकृत केंद्राला भेट द्या
मतदार ओळखपत्र	https://voterportal.eci.gov.in/ वरून ऑनलाईन प्राप्त करा
(PAN) कार्ड	https://www.onlineservices.nsdl.com/ वरून ऑनलाईन प्राप्त करा
पारपत्र	पारपत्र कार्यालय
शिधा पत्रिका	गट कार्यालय
जन्म दाखला	नगरपरिषद कार्यालयातील जन्म व मृत्यू नोंदणी कार्यालय
मृत्यू प्रमाणपत्र	नगरपरिषद कार्यालयातील जन्म व मृत्यू नोंदणी कार्यालय
जात प्रमाणपत्र	महा e-सेवा केंद्र,जिल्हा नायब तहसीलदार कार्यालय,तहसील कार्यालय
उत्पन्न प्रमाणपत्र	महा e-सेवा केंद्र, तलाठी कार्यालय,तहसील कार्यालय
विवाह प्रमाणपत्र	नगरपंचयात/नगरपरिषद कार्यालय, PHC कार्यालय
दिव्यांगता प्रमाणपत्र	सामाजिक सुरक्षितता व दिव्यांग व्यक्ती सक्षमता प्रवर्तन विभाग
अन्य मागासवर्ग प्रमाणपत्र	जिल्हा समाज कल्याण अधिकारी कार्यालय, तहसील कार्यालय,महा e-सेवा केंद्र
कोव्हीड १९ लसीकरण प्रमाणपत्र	https://www.cowin.gov.in/ वरून ऑनलाईन प्राप्त करा

टेबल/तक्ता १५ समाज कल्याण योजनेसाठी लागणारे आंवश्यक दस्तवेज

क. आवश्यक

लसीकरण व त्याची वारंवारिता

आवश्यक लसीकरण	वारंवारिता
धनुर्वात (Tetanus)	कोणत्याही धातुने जखम/ इजा झाल्यास
विषमज्वर (Typhoid fever)	२ वर्ष मध्ये एकदा
बालपक्षाघात (Polio)	वय २ महिने, ४ महिने, ६ ते ८ महिने, आणि ४ ते ५ वर्षांमध्ये
अ व ब प्रकारच्या यकृतदाहापासून संरक्षण (Hepatitis A and Hepatitis B vaccinations)	३ डोस पहिला ते दुसऱ्यामध्ये १ महिन्याचा कालावधी दुसरा व तिसऱ्यामध्ये ६ महिन्यांचा कालावधी आणि ४ था डोस हा १ वर्षाच्या कालावधीमध्ये घेणे आवश्यक आहे

टेबल/तक्ता १६ लसीकरण व वारंवारिता

परिशिष्ट अ

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५	
मिळकतीमध्ये (बाजार/ शाळा / नाट्यगृह) यामध्ये कर्मचारी आहेत त्यांचेसाठी शौचालय किंवा संडासची व्यवस्था नाही.	कलम २०७ (२)
आपल्या मिळकतीच्या जागेत संडास/ जल धौत शौच कूप हे नादुरुस्त अवस्थेत असून त्यावरील छप्पर /भिंती नादुरुस्त स्थितीत आहे.	कलम २०७(३)
मिळकतीच्या आवारातील सर्व मोऱ्या / संडास /जल धौत शौच कूप / घरांच्या नाल्या/ गटारे व मलकुंड्या या नादुरुस्त आहेत.	कलम २०८(१)
मिळकतीच्या आवारातील सर्व मोऱ्या / संडास / जल धौत शौच कूप / घरांच्या नाल्या/ गटारे व मल कुंड्या या अस्वच्छ आहेत	कलम २०८(२)
मिळकतीच्या आवारातील सर्व संडास व मलकुंड्या या नादुरुस्त आहेत. तसेच स्वच्छ करण्यासाठी दुर्गम अशा रीतीने बांधलेले आहे.	कलम २०८(३)
मिळकतीच्या किंवा जमिनीची मोरी मलकुंडी किंवा नगरपालिकेच्या मोरीस किंवा जलनिस्सारण नलिकेस जोडलेली आहे. तथापि सार्वजनिक जलनिस्सारण पद्धतीशी जुळणारी नाही	कलम २०९
मिळकतीच्या आवारातील मोरी चे सांडपाणी आपण आपल्या वापरातील /इतरांच्या वापरातील गटार /ड्रेनेज लाईन ला विनापरवाना जोडलेले आहे.विनापरवाना सांडपाण्याची लाईन विखंडीत केली आहे./गटारावर ड्रेनेज लाईनवर आपण बांधकाम करून ड्रेनेज लाईन अथवा गटार वाहण्यास प्रतिबंध केला आहे.	कलम २१०

मिळकतीमधील संडास / मोरी / जल धौत शौच कूप / घराची नाली किंवा मल कुंडी आपण नव्याने बांधली / पुन्हा बांधली किंवा उघडली आहे.	कलम २११ (१)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन चांगल्या स्थितीत राखलेले नाही.	कलम २२० (१) (अ)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठ्याचे इतर साधन त्यातील गाळ, कचरा व सडलेली झाडे झुडपे असल्याने पाणी वापरण्यायोग्य नाही.	कलमा २२० (१) (ब)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन .....मुळे दूषित किंवा सांसर्गिक झालेले असल्याने पाणी वापरण्यायोग्य नाहीत	कलम २२० (१) (क)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन .....नादुरुस्त, संरक्षण किंवा कुंपण नसल्यामुळे आरोग्यास व सुरक्षिततेस धोकादायक झाला आहे	कलम २२० (१) (ड)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरावठयाचे इतर साधन यातील पाणी पिण्यास योग्य नाही .	कलम २२० (१) (इ)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन यातील पाणी पिण्यास योग्य नसल्याने त्याचा वापर पिण्यासाठी न करण्याची सूचना दिली असतानाही आपण ते पाणी पिण्यासाठी वापरात आहात/ इतरांना वापरू देत आहात .	कलम २२० (१)(फ)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन यातील पाणी पिण्यास योग्य नाही.	कलम २२० (१)(ग)
मिळकतीच्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन यावर मोठ्या प्रमाणात झाड झाडोरा लोंबकळत राहिल्याने पाणी दूषित होत आहे किंवा होण्याचा संभाव आहे.	कलम २२० (३)
पाण्याच्या (पाण्याच्या स्रोतांचे ठिकाण)या ठिकाणी पुरुष, स्त्रिया यांच्या अंघोळीच्या वेळा/ जनावरे धुण्याच्या वेळा/ कपडे धुणे/ भांडी घासणे/ इ.	कलम २२१
उपद्रवकारक किंवा धोकादायक असलेली किंवा होऊ शकेल अशी कोणत्याही इतर वस्तु टाकून उपद्रव निर्माण केला आहे.	कलम २२९ (१)

उपद्रवकारक किंवा धोकादायक असलेली किंवा होऊ शकेल अशी कोणत्याही इतर वस्तु किंवा मैला टाकून उपद्रव निर्माण केला आहे.	कलम २२९ (२)
दुर्गंधीयुक्त पदार्थ रस्त्यावर / उघड्या मोरीत वाहत ठेवला.	कलम २३०
आपल्या मिळकतीमध्ये डबके /खंदक /दगडखाण /छिद्र /खळगा /तलाव /विहीर /तळे /मोरी /जलप्रवाह किंवा कोणतेही साचलेले पाणी असल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. त्यामुळे अनारोग्यकारक परिस्थिती निर्माण झाली आहे.	कलम २३४ (१) (अ)
मिळकतीमध्ये पाणी साठवण्याची टाकी किंवा कोणतेही पात्र ज्यात साचलेले पाणी असल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. त्यामुळे अनारोग्यकारक परिस्थिती निर्माण झाली आहे.	कलम २३४ (१)(ब)
आपल्या मिळकतीमध्ये आपण विनापरवाना खाजगी बाजार /खाजगी कत्तलखाना /मानवी खाद्यासाठी मांस किंवा मासे किंवा जनावरे किंवा पक्षी ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या विक्रीसाठी उपयोग करीत आहात.	कलम २६७
या ठिकाणी आपला खाजगी बाजार /खाजगी कत्तलखाना असून त्यामध्ये बाजाराच्या जागेची/ कत्तलखान्याच्या संपूर्ण जमिनीची तळसरी पातळीत नसल्याने /या ठिकाणी पाटमुख मोरी नसल्याने / जागा अस्वच्छ व चांगल्या स्थितीत नसल्याने / गाळयांचे छप्पर व अन्य जागा / या ठिकाणी संडास / शौचकूप किंवा मुतारी नसल्याने / जागा अनारोग्यकारक आहे.	कलम २७०

टेबल/तक्ता १७ महाराष्ट्र नगरपरिषदा, नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५

पत्राचा नमुना

श्री.....

पत्ता.....

विषय: ..... कारवाई नोटीस

आपल्या मिळकती .....तसेच
स्थानिक स्वराज्य संस्थेने ठरवून दिलेल्या नियमांचे आपण उल्लंघन केले आहे.

त्यामुळे आपणाविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम २२१ अन्वये कारवाई करण्यात येईल.
कृपया या नोटीसद्वारे आपणास कळवण्यात येते की, आपण पुढील ७ दिवसांच्या आत आपली बाजू मांडण्यासाठी कार्यालयात हजर रहावे. तपासणीत आपण दोषी आढळल्यास, आपणावर दंड आकारला जाऊ शकतो. सदरची नोटीस मिळाले पासून..... दिवसात वरील ठिकाणी खालील प्रमाणे योग्य अशी तरतूद करावी.
स्थानिक स्वराज्य संस्थेने ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. भविष्यात अशा प्रकारचे कृत्य पुन्हा आपल्याकडून घडणार याची दक्षता घ्यावी.आपला विश्वासू,

आपण सदर चे काम दिलेल्या मुदतीत न केल्यास आपल्या विरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम .....अन्वये कारवाई करण्यात येईल.

मुख्याधिकारी

---------- नगरपंचायत/नगरपरिषद

श्री.....

पत्ता.....

विषय: .....

आपल्या मिळकती च्या आवारातील मोरी चे सांडपाणी आपण आपल्या वापरातील /इतरांच्या वापरातील गटार /ड्रेनेज लाईन ला विनापरवाना जोडलेले आहे. विनापरवाना सांडपाण्याची लाईन विखंडीत केली आहे./गटारावर ड्रेनेज लाईनवर आपण बांधकाम करून ड्रेनेज लाईन अथवा गटार वाहण्यास प्रतिबंध केला आहे.
सदरची नोटीस मिळाल्यापासून ..... दिवसात वरील ठिकाणी खालीलप्रमाणे दुरुस्त्या कराव्यात.
आपल्या मिळकतीच्या आवारातील मोरीचे बांधकाम त्वरीत काढून टाकावे./मोरीचे सांडपाणी अस्तित्वात असलेल्या सांडपाण्याच्या व्यवस्थेशी जोडावे /पूर्ववत जोडावे /नवीन केलेले बांधकाम काढून सांडपाण्याची व्यवस्था पूर्ववत करावी.
आपण सदर चे काम दिलेल्या मुदतीत न केल्यास आपल्या विरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलमा २१० अन्वये कारवाई करण्यात येईल.

मुख्य अधिकारी

श्री.....

पत्ता.....

विषय: .....

(गावाचा पत्ता) येथील आपल्या मिळकती मध्ये बाजार/ शाळा / नाट्य गृह अस्तित्वात आहेत यामध्ये कर्मचारी आहेत त्यांचेसाठी शौचालय किंवा संडासची व्यवस्था नाही.
सदरची नोटीस मिळाले पासून.. दिवसात खालील प्रमाणे तरतूद करांवी.
वरील ठिकाणी काम करणाऱ्या कर्मचार्यांसाठी आवश्यक त्या संख्येत चांगल्या प्रतीचे साहित्य वापरुन चांगला संडास/ जलधौत शौच कूप बांधण्यात यावे. त्यांची नियमित स्वच्छता करावी.

आपण सदर चे काम दिलेल्या मुदतीत न केल्यास आपल्या विरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलमा २०७ (२) अन्वये कारवाई करण्यात येईल.

मुख्य अधिकारी

श्री.....

पत्ता.....

विषय: .....

या ठिकाणी आपल्या मिळकतीमध्ये आपण विनापरवाना खाजगी बाजार /खाजगी कत्तलखाना /मानवी खाद्यासाठी मांस किंवा मासे किंवा जनावरे किंवा पक्षी ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या विक्रीसाठी उपयोग करीत आहात.
ही नोटीस मिळालेपासून.....दिवसांत खाली दर्शवल्याप्रमाणे कार्यवाही करावी
आपल्या मिळकतीमध्ये आपण विनापरवाना खाजगी बाजार /खाजगी कत्तलखाना /मानवी खाद्यासाठी मांस किंवा मासे किंवा जनावरे किंवा पक्षी ठेवण्यासाठी किंवा त्यांच्या विक्रीसाठी उपयोग करीत आहात. सदरिल बाब अपराधजन्य आहे. त्यामुळे विनापरवाना असा व्यवसाय त्वरीत बंद करावा
अन्यथा आपणाविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम २६७ अन्वये कारवाई करण्यात येईल.

मुख्य अधिकारी

श्री.....

पत्ता.....

विषय: .....

आपले मिळकती च्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन चांगल्या स्थितीत राखलेले नाही.
सदर ची नोटीस मिळाले पासून.. दिवसात वरील ठिकाणी खालील प्रमाणे दुरुस्त्या कराव्यात.
आपले मिळकती च्या आवारातील विहीर/ ओहोळ / पाट / तळे किंवा पाणी पुरवठयाचे इतर साधन चांगल्या स्थितीत नसल्याने ते वापरण्यात येत नसल्याने ते वापरण्यायोग्य करावे.
आपण सदर चे काम दिलेल्या मुदतीत न केल्यास आपल्या विरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा , नगर पंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलमा २२० (१) (अ)अन्वये कारवाई करण्यात येईल.

मुख्य अधिकारी

श्री.....

पत्ता.....

विषय: .....

.....या ठिकाणी आपण.....या वेळी.....या पध्दतीने रस्त्यात किंवा रस्त्याखालील कोणत्याही कमाणीत किंवा रस्त्याच्या बाजूस असलेल्या कोणत्याही मोरीत किंवा खुल्या सार्वजनिक जागेत किंवा कोणत्याही धक्यावर,लहान धक्यावर उतरण्याच्या जागेवर किंवा समुद्र किनाऱ्याच्या कोणत्याही भागावर किंवा खाडीच्या काठावर किंवा भरतीच्या सीमेच्या वर किंवा खाली किंवा नदीच्या जलप्रवाहाच्या किंवा नाल्याच्या काठावर कोणतीही धूळ ,घाण, शेण, कचरा किंवा कोणत्याही प्रकारची गदळ किंवा कोणताही प्राणिज पदार्थ किंवा कोणतेही काचेचे किंवा मातीच्या वस्तूचे तुकडे किंवा इतर केरकचरा उपद्रवकारक किंवा धोकादायक असलेली किंवा होऊ शकेल अशा कोणत्याही इतर वस्तु टाकून उपद्रव निर्माण केला आहे.
त्यामुळे आपणाविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम २२९ (१) अन्वये कारवाई कारण्यात येईल.

मुख्य अधिकारी

श्री.....

पत्ता.....

विषय: .....

..... या ठिकाणी आपल्या मिळकतीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठून राहिल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. त्यामुळे अनारोग्यकारक परिस्थीती निर्माण झाली आहे.
ही नोटीस मिळालेपासून.....दिवसांत खाली दर्शवल्याप्रमाणे कार्यवाही करावी.
आपल्या मिळकतीमध्ये मोठ्या प्रमाणात पाणी साठून राहिल्याने यामध्ये मोठ्या प्रमाणात डासांची उत्पत्ती होत आहे. त्यामुळे अनारोग्यकारक परिस्थिती निर्माण झाली आहे. या जमिनीवरील सर्व पाणी काढून टाकून जमीन कोरडी करावी की ज्यायोगे साचलेल्या पाण्यावरील डासोत्पत्ती त्वरीत बंद होईल.
अन्यथा आपणाविरुद्ध महाराष्ट्र नगरपरिषदा,नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ च्या कलम २३४ (१)(क) अन्वये कारवाई करण्यात येईल.

मुख्य अधिकारी